दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/नि.सा.मं. कार्य/२०२३/ 1649 दिनांक : 20 APR 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : - महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये – निवडणूक साक्षरता मंडळ कार्यान्वित करण्यासाठी वर्शिप अर्थ फाऊंडेशन आणि आम्ही शिक्षक या संस्थाचे सहकार्य करण्याबाबत...**

**संदर्भ :- १. मा.अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी, संकीर्ण- २०२३/प्र.क्र.७६६/का-३३, दिनांक ११.०४.२०२३**
**२. मा. सहा. संचा. तंत्रशिक्षण संचालनालय, महा.राज्य.मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/नि.सा.मं.कार्य/२०२३/१०८ दि. १३.०४.२०२३**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रात नमूद केल्यानुसार राज्यातील सर्व अकृषी, स्वयंअर्थसाय्यित, अभिमत विद्यापीठे आणि संलग्नित असलेल्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/पदवी महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थेत (वयोगट-१९-२५) "निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करुन कार्यान्वित करण्यात यावे असा शासनाचा मानस आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये "निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करुन कार्यान्वित करण्यासाठी, त्याचे वेळोवेळी योग्य नियोजन, निवडणूक साक्षरता, मतदार नोंदणी, तत्सम कार्ये, कार्यक्रम आणि माहिती संकलन करुन त्याची अद्यायावत पुस्तिका करण्यासाठी " वर्शिप अर्थ फाउंडेशन " आणि " आम्ही शिक्षक " ह्या संस्था मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला प्रमुख सहकार्य करीत आहेत. या संस्थांचे प्रतिनिधी, पदाधिकारी हे महाविलयांतील कार्यकारिणी विद्यार्थी, नोडल अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांची नेमणूक करुन त्यांच्याशी योग्य समन्वय साधून त्यांना विविध कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरित करणार आहेत, असे शासनाने कळविले आहे.

त्यानुषंगाने संदर्भीय पत्रात दिलेल्या निर्देशानुसार या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांमध्ये "निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करुन कार्यान्वित करण्यासाठी, संस्थेचे प्राचार्य, प्रतिनिधी, नोडल अधिकारी आणि विद्यार्थी यांना सदर उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे आणि योग्य सूचना द्याव्यात. तसेच आपल्या महाविद्यालयातील माहिती, संपर्क इ. संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करावेत व वेळोवेळी सहकार्य करुन अधिकाधिक "निवडणूक साक्षरता मंडळ" कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास **संस्थाप्रमूखांच्या स्वाक्षरीसह** info.dteropune@gmail.com **या ईमेलवर सादर करण्यात यावा.**

**अधिक माहितीसाठी संपर्क : तेजस गुजराथी – ९०१११६६६६३ (वर्शिप अर्थ फाऊंडेशन)**
**सुशिल शेजुळे – ९६०४५२३६६६ (आम्ही शिक्षक - ठाणे व पालघर)**

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**ई - मेलव्दारे**

क्रमांक : १६/आस्था/नि.सा.मं.कार्य/२०२३/१०८
दिनांक : 13 APR 2023

प्रति,
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**विषय : महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये - निवडणूक साक्षरता मंडळ कार्यन्वित करण्यासाठी वर्शिप अर्थ फाऊंडेशन आणि आम्ही शिक्षक या संस्थाचे सहकार्य करण्याबाबत..**

संदर्भ : अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी, संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६६/कार्या-३३, दिनांक ११/०४/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रात नमूद केल्यानुसार राज्यातील सर्व अकृषी, स्वयंअर्थसाहाय्यित, अभिमत विद्यापीठे आणि संलग्नित असलेल्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / पदवी महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थेत ( वयोगट - १९-२५ ) "निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करून कार्यन्वित करण्यात यावे असा शासनाचा मानस आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये " निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करून कार्यन्वित करण्यासाठी, त्याचे वेळोवेळी योग्य नियोजन, निवडणूक साक्षरता, मतदार नोंदणी, तत्सम कार्ये, कार्यक्रम आणि माहिती संकलन करून त्याची अद्यावत पुस्तिका करण्यासाठी – "वर्शिप अर्थ फाऊंडेशन" आणि "आम्ही शिक्षक" हया संस्था मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला प्रमुख सहकार्य करीत आहेत. या संस्थांचे प्रतिनिधी, पदाधिकारी हे महाविद्यालयांतील कार्यकरिणी विद्यार्थी, नोडल अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांची नेमणूक करून त्यांच्याशी योग्य समन्वय साधून त्यांना विविध कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरित करणार आहेत, असे शासनाने कळविले आहे.

त्या अनुषगांने संदर्भिय पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपल्या अखत्यारितील संस्थांमध्ये "निवडणूक साक्षरता मंडळ" स्थापन करून कार्यन्वित करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य, प्रतिनिधी, नोडल अधिकारी आणि विद्यार्थी यांना सदर उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे आणि योग्य सूचना द्याव्यात. आपल्या स्तरावरील अधिपत्याखालील प्रत्येक महाविद्यालयातील माहिती, संपर्क इ. सदर संस्थांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करावेत व वेळोवेळी सहकार्य करून अधिकाधिक "निवडणूक साक्षरता मंडळ" कार्यन्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

अधिक माहितीसाठी संपर्क : तेजस गुजराथी – ९०१११६६६६३ ( वर्शिप अर्थ फाऊंडेशन )
सुशील शेजुळे – ९६०४५२३६६६ ( आम्ही शिक्षक – ठाणे व पालघर )

**सोबत : संदर्भिय पत्र**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
17 APR 2023
आवक क्र. 3328अ

आपला

( श्रीकांत मडावी )
सहाय्यक संचालक, तांत्रिक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

२०
१३/०४/२०२३

क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६६ /कार्या-३३
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ एप्रिल, २०२३

प्रति,

डॉ. विनोद एम मोहितकर
प्रभारी संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय: महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये -निवडणूक साक्षरता मंडळ कार्यन्वित करण्यासाठी -वर्शिप अर्थ फाऊंडेशन॰ आणि आम्ही शिक्षक या संस्थांचे सहकार्य करण्याबाबत.

महोदय,

आपल्याशी चर्चा झाल्याप्रमाणे राज्यातील सर्व अकृषी, स्वयंअर्थसाहाय्यित, अभिमत विद्यापीठे आणि संलग्नित असलेल्या सर्व शासकिय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित/ पदवी महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्थेत (वयोगट - १९-२५) -निवडणूक साक्षरता मंडळ॰ स्थापन करून कार्यान्वित करण्यात यावे, असा आमचा मानस आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये -निवडणूक साक्षरता मंडळ॰ स्थापन करून कार्यान्वित करण्यासाठी, त्याचे वेळो-वेळी योग्य नियोजन, निवडणूक साक्षरता, मतदार नोंदणी, तत्सम कार्ये, कार्यक्रम आणि माहिती संकलन करून त्याची अद्ययावत पुस्तिका करण्यासाठी -वर्शिप अर्थ फाऊंडेशन॰ आणि -आम्ही शिक्षक॰ ह्या संस्था मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला प्रमुख सहकार्य करीत आहेत. ह्या संस्थांचे प्रतिनिधी, पदाधिकारी हे महाविद्यालयांतील कार्यकारिणी विद्यार्थी, नोडल अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांची नेमणूक करून त्यांच्याशी योग्य समन्वय साधून त्यांना विविध कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरित करणार आहेत.

महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांत -निवडणूक साक्षरता मंडळ॰ कार्यान्वित करण्यासाठी; महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रतिनिधी आणि विद्यार्थी यांना सदर उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे आणि योग्य सूचना द्याव्यात. ~~याकरिता महाराष्ट्रातील~~ प्रत्येक महाविद्यालयातील माहिती, संपर्क इ. सदर संस्थांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करावेत व वेळोवेळी सहकार्य करून अधिकाधिक -निवडणूक साक्षरता मंडळ॰ कार्यान्वित करण्यासाठी आपला बहुमूल्य सहभाग असावा, ही विनंती!

अधिक माहितीसाठी संपर्क : तेजस गुजराथी - ९०१११६६६६३ (वर्शिप अर्थ फाऊंडेशन)
सुशील शेजुळे - ९६०४५२३६६६ (आम्ही शिक्षक - ठाणे व पालघर)

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. P-03
दिनांक 13/4/2023
कार्यासन क्र. २६

आपला,

श्रीकांत देशपांडे
अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य.

प्रत,

सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी
मुख्य कार्यकारी अधिकारी, -वर्शिप अर्थ फाऊंडेशन॰
संस्थापक, -आम्ही शिक्षक॰

कार्या-२६
सर्व विभागीय सहसंचालकांना कार्यवाही करण्याकरिता उपरोक्त नुसार कळवावे.